• वर्ष : ०३ • अंक : २७५ • पुणे • शुक्रवार, दि. २६ जून २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक





नागरिकांना ट्रॅफिक जाममधून दिलासा 3



भारतीय संगीत परंपरेला नव्या युगाचा स्वर 4

# शाळेत विद्यार्थिनीचा छळ?

## शिक्षकाविरुद्ध पॉक्सोअंतर्गत गुन्हा; शिक्षण क्षेत्रात खळबळ

**कर्जत (दै. आरंभ पर्व)**

अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात एका माध्यमिक विद्यालयातील शिक्षकाविरुद्ध अल्पवयीन विद्यार्थिनीने गंभीर आरोप करत तक्रार दाखल केल्याने शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. संबंधित शिक्षकाने विद्यार्थिनीला वारंवार शाळेच्या कार्यालयात बोलावून मानसिक त्रास दिला, अयोग्य वर्तन केले तसेच परीक्षेतील गुणांचे आमिष आणि दबाव टाकल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी कर्जत पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) आणि बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण (पॉक्सो) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपासाला सुरुवात केली आहे. पोलिसांकडे दाखल झालेल्या फिर्यादीनुसार, हा प्रकार ३० जून २०२५ ते १ मे २०२६ या कालावधीत घडला असल्याचे नमूद करण्यात आले



आहे. फिर्यादी ही १५ वर्षीय विद्यार्थिनी असून ती कर्जत तालुक्यातील एका माध्यमिक विद्यालयात शिक्षण घेत आहे. तिने दिलेल्या तक्रारीनुसार, शाळेतील शिक्षक वारंवार विविध कारणांनी तिला कार्यालयात बोलावत होते. सुरुवातीला शालेय कामाच्या निमित्ताने सुरू झालेला संवाद पुढे वैयक्तिक स्वरूप धारण करू लागल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, शिक्षक विद्यार्थिनीला वर्गातून किंवा शाळेच्या परिसरातून बोलावून घेत असत. यावेळी तिच्याशी एकांतात चर्चा केली जात असे. या चर्चेदरम्यान तिच्या वैयक्तिक आयुष्याशी संबंधित प्रश्न विचारले जात असल्याचे तसेच तिच्यावर मानसिक दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे फिर्यादीचे म्हणणे आहे.

सततच्या या प्रकारामुळे विद्यार्थिनी अस्वस्थ झाली होती. शाळेत जाण्याची भीती वाटणे, अभ्यासात लक्ष न लागणे आणि मानसिक तणाव वाढणे अशा समस्या निर्माण झाल्याचे तिच्या जबाबात नमूद करण्यात आले आहे. या प्रकारामुळे ती अनेकदा घाबरलेली आणि चिंताग्रस्त राहत होती. काही काळ हा प्रकार सहन केल्यानंतर तिने घडलेली बाब आपल्या कुटुंबीयांना सांगितली. त्यानंतर कुटुंबीयांनी पोलिसांकडे धाव घेत तक्रार नोंदविली.

प्राथमिक चौकशीनंतर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ७५ तसेच पॉक्सो कायद्यातील कलम ८ आणि १२ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. अल्पवयीन मुलांवरील लैंगिक अत्याचार आणि छळाच्या घटनांमध्ये पॉक्सो कायदा अत्यंत कठोर मानला जातो. त्यामुळे या प्रकरणाकडे गंभीरतेने पाहिले जात आहे.

घटना उघडकीस आल्यानंतर शाळा परिसरात आणि स्थानिक नागरिकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या संरक्षणाच्या यंत्रणांबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. अल्पवयीन विद्यार्थ्यांच्या तक्रारी गांभीर्याने घेतल्या जाव्यात, तसेच शाळांमध्ये तक्रार निवारण यंत्रणा अधिक सक्षम करण्याची गरज असल्याची प्रतिक्रिया पालकांकडून व्यक्त केली जात आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक प्रदीप बोरहाडे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

### सत्य तपासातूनच स्पष्ट होणार

दरम्यान, संबंधित प्रकरणातील आरोप गंभीर स्वरूपाचे असले तरी त्याची अंतिम सत्यता पोलिस तपास आणि न्यायालयीन प्रक्रियेनंतरच स्पष्ट होणार आहे. सध्या पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला असून सर्व बाजूंचा सखोल अभ्यास केला जात आहे. तपासातून समोर येणाऱ्या निष्कर्षांनुसार पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

### गुणांचे आमिष आणि दबावाचा आरोप

विद्यार्थिनीच्या जबाबानुसार, संबंधित शिक्षकांकडून शैक्षणिक प्रगती आणि परीक्षेतील गुण यांचा उल्लेख करून वारंवार दबाव टाकला जात होता. नववीच्या परीक्षेतील गुण, पुढील शैक्षणिक वाटचाल आणि शाळेतील प्रगती यांचा संदर्भ देत तिला घाबरविण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप आहे. काही वेळा शिक्षकांकडून "तुझे गुण कमी पडतील", "तू पुढे जाऊ शकणार नाहीस" अशा स्वरूपाच्या सूचक इशाऱ्यांमुळे विद्यार्थिनी मानसिक तणावाखाली गेल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

## ठळक बातम्या



### हवाई प्रवासाचा अनुभव बदलणार

पुणे (आरंभ पर्व) : प्रवाशांचा पुणे-दिल्ली विमान प्रवास आता आरामदायक होणार असून, या प्रवासात 'बिझनेस क्लास'ची (स्ट्रेच क्लास) सुविधा सुरू झाली आहे. यापूर्वीदेखील एका विमान कंपनीने पुण्यातून बिझनेस क्लासची सुविधा सुरू केली होती. आता पुन्हा नव्याने सुरू झाली असून, याला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद लाभत आहे. याचे तिकीट दर प्रतिप्रवासी २५ हजारांपासून आहेत. पुणे-दिल्ली हा देशातील सर्वांत व्यग्र आणि महत्त्वाच्या हवाई मार्गांपैकी एक आहे. या मार्गावर दररोज हजारो प्रवासी प्रवास करतात. पुणे ते दिल्लीदरम्यान दररोज सुमारे ४६ विमानांची उड्डाणे होतात. पुणे-दिल्ली हा देशातील सर्वाधिक वर्दळीच्या अन् प्रवासी संख्येच्या दृष्टीने देशातील सातवा सर्वाधिक व्यग्र हवाई मार्ग आहे.

### साहिल गोयलची कसून चौकशी

पुणे (आरंभ पर्व) : लोहगड किल्ल्यावर रिअल इस्टेट व्यावसायिक केतन अग्रवाल यांच्या हत्येप्रकरणी तपासाला नवे वळण मिळाले आहे. या गाजलेल्या प्रकरणात आता पोलिसांनी सिया गोयलचा भाऊ साहिल गोयल यालाही चौकशीसाठी बोलावले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, साहिलला सिया गोयल आणि चेतन चौधरी यांच्यातील कथित प्रेमसंबंधांची आधीपासून माहिती होती. ही बाब त्याने कुटुंबीयांना किंवा इतर कोणालाही का सांगितली नाही, याचा तपास पोलिस करत आहेत. पोलिसांच्या मते, साहिलचा जबाब या प्रकरणातील अनेक महत्त्वाच्या बाबींवर प्रकाश टाकू शकतो. सध्या त्याची सविस्तर चौकशी सुरू असून, सियाची मानसिक अवस्था, तिचे वैयक्तिक संबंध आणि लग्नाबाबत कुटुंबात काय चर्चा होत होती, याचीही माहिती घेतली जात आहे.

### कंटेनर पडला बंद

पुणे (आरंभ पर्व) : पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गावरील नवीन कात्रज बोगद्यात शुक्रवारी (ता. २६) सकाळच्या सुमारास एक कंटेनर अचानक बंद पडल्याने मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. साताऱ्याच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर वाहनांची तब्बल पाच किलोमीटरपर्यंत रांग लागली होती. कार्यालयीन वेळ असल्याने कामावर जाणारे नागरिक, प्रवासी, मालवाहू वाहनचालक तसेच एसटी आणि खासगी बसमधील प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. मिळालेल्या माहितीनुसार, सकाळी सुमारे ७.३० वाजण्याच्या सुमारास नवीन कात्रज बोगद्यातून साताऱ्याकडे जाणाऱ्या लेनमध्ये एक कंटेनर तांत्रिक बिघाडामुळे बंद पडला. बोगद्यातील अरुंद मार्गामुळे मागील वाहतुकीचा वेग पूर्णपणे मंदावला आणि काही वेळातच वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या.

## लिफ्ट देण्याच्या बहाण्याने दौंडमध्ये कामगाराची लूट

**दौंड (दै. आरंभ पर्व)**

दौंड कॅार्ड लाईन रेल्वे स्थानकाकडे पायी निघालेल्या एका कंपनी कामगाराला लिफ्ट देण्याच्या बहाण्याने दुचाकीवर बसवून मारहाण करत २७,९०० रुपयांचा ऐवज लुटल्याची घटना घडली आहे. १३ जून रोजी रात्री पावणेबाराच्या सुमारास दौंड शहरातील गोल राउंड परिसरात हा प्रकार घडला.

कुरकुंभ एमआयडीसीमधील एका खासगी कंपनीत काम करणारे प्रशांत पांडुरंग हरमकर (वय २३, रा. खामगाव, जि. बुलढाणा) हे रेल्वेने मूळ गावी जाण्यासाठी दौंड शहरातील गोल राउंड येथे उतरले होते. दौंड कॉर्ड लाइन रेल्वे स्थानक तेथून ४ किलोमीटर अंतरावर असल्याने ते पायी निघाले होते. दरम्यान, दुचाकीवरून आलेल्या दोन तरूणांनी त्यांना लिफ्ट देण्याच्या बहाण्याने गाडीवर बसवले. पुढे अंधारात नेऊन तिसऱ्या साथीदारासह तिघांनी प्रशांत



हरमकर यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. चोरट्यांनी त्यांच्याजवळील मोबाईल, रोख रक्कम, एटीएम कार्ड आणि ओळखपत्रे, असा एकूण २७ हजार ९०० रुपयांचा ऐवज लुटून नेला. या प्रकरणी मंगळवारी (ता. २३) दौंड पोलिस ठाण्यात प्रशांत हरमकर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार तीन अज्ञातांविरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


## हुंड्यासाठी छळ; बेल्ट व क्रिकेट बॅटने मारहाण, पतीविरुद्ध गुन्हा

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

लग्नानंतर पत्नीवर नोकरी करण्यासाठी सातत्याने दबाव टाकणे, माहेराहून दहा लाख रुपये आणण्याची मागणी करणे, शारीरिक व मानसिक छळ करणे, तसेच बेल्ट आणि क्रिकेटच्या बॅटने मारहाण करून घराबाहेर काढल्याप्रकरणी पतीविरुद्ध लोणी काळभोर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी प्रशांत बन्सीलाल महाजन (रा. सोनगीर, जि. धुळे) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३३ वर्षीय फिर्यादी महिलेचा विवाह ३ डिसेंबर २०१७ रोजी हिंदू रीतीरिवाजानुसार झाला होता. सुरुवातीला संसार सुरळीत सुरू असताना काही महिन्यांनंतर पतीने पत्नीवर नोकरी करून पगार घरी आणण्याचा दबाव टाकण्यास सुरुवात केली. "मी तुला एकटा सांभाळू शकत नाही," असे




सांगत वारंवार माहेराहून दहा लाख रुपये आणण्याची मागणी केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

फिर्यादी तीन महिन्यांच्या गरोदर असतानाही त्यांना मारहाण व शिवीगाळ करण्यात आली. मुलीच्या जन्मानंतरही किरकोळ कारणांवरून वाद घालणे, आई-वडिलांचा अपमान करणे आणि पुन्हा संसार करायचा असेल तर सासूसमोर माफी मागण्याची अट घालण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. पतीची बदली बडोदा येथे झाल्यानंतरही आर्थिक कारणांवरून मानसिक व शारीरिक छळ सुरूच राहिला. सन २०२१ मध्ये पुण्यात आल्यानंतरही नोकरी करण्यासाठी दबाव टाकत दहा लाख रुपयांची मागणी करून घराबाहेर काढल्याचे फिर्यादीने म्हटले आहे.

दरम्यान, आर्थिक अडचणीचे कारण सांगून पतीने फिर्यादीचे साडेसहा तोळे आणि मुलीचे दोन तोळे सोन्याचे दागिने घेतल्याचा आरोप आहे. तसेच पत्नीच्या नावावर दहा लाख रुपयांचे कर्ज काढून त्याचा स्वतःच्या कामासाठी वापर केला आणि कर्जफेडीची जबाबदारी तिच्यावर टाकल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याच काळात बेल्ट व क्रिकेटच्या बॅटने वारंवार मारहाण करण्यात आली. अनेकदा मध्यरात्री घराबाहेर काढून रात्रभर बाहेर बसण्यास भाग पाडल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

अखेर २ ऑगस्ट २०२५ रोजी पतीने कायमचे माहेरी पाठवून दिल्यानंतर पीडित महिलेने लोणी काळभोर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी प्रशांत महाजन याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# फळ्यावरचा सुविचारही वाचता आला नाही

## ३० पैकी २८ विद्यार्थी वाचनात अपयशी, महापालिका शाळेची धक्कादायक स्थिती

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महापालिकेच्या शिक्षण व्यवस्थेतील गंभीर त्रुटी पुन्हा एकदा समोर आल्या आहेत. कोंढवे-धावडे येथील महापालिकेच्या प्राथमिक शाळेला गुरुवारी दिलेल्या अचानक भेटीदरम्यान विद्यार्थ्यांच्या वाचनक्षमतेचे अत्यंत चिंताजनक चित्र उघड झाले. वर्गातील फळ्यावर लिहिलेला साधा सुविचार ३० विद्यार्थ्यांपैकी तब्बल २८ विद्यार्थ्यांना वाचता आला नाही. केवळ दोन विद्यार्थिनींनाच तो सुविचार वाचता आल्याने प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

पुणे महापालिकेच्या शिक्षण समितीचे अध्यक्ष अरुण राजवाडे आणि आमदार भीमराव तापकीर यांनी गुरुवारी कोंढवे-धावडे येथील महापालिकेच्या शाळेला अचानक भेट देत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेची प्रत्यक्ष पाहणी केली. कोणतीही पूर्वकल्पना न देता घेण्यात आलेल्या या तपासणीत विद्यार्थ्यांच्या मूलभूत



शैक्षणिक कौशल्यांची चाचणी घेण्यात आली. त्यावेळी इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची वाचन, लेखन आणि गणिताची क्षमता तपासण्यात आली.

पाहणीत इयत्ता पाचवी ते सातवीतील विद्यार्थ्यांनी मराठी आणि हिंदीचे वाचन तसेच गणितातील उदाहरणे समाधानकारक पद्धतीने सोडविली. मात्र, इयत्ता पहिली ते तिसरीतील विद्यार्थ्यांची स्थिती अत्यंत चिंताजनक असल्याचे स्पष्ट झाले. अनेक विद्यार्थ्यांना साधे शब्द ओळखता येत नव्हते, तर फळ्यावर लिहिलेला सुविचारही वाचता येत नसल्याचे निदर्शनास आले. यामुळे प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांच्या वाचन कौशल्याच्या विकासाकडे आवश्यक तेवढे लक्ष दिले जात नसल्याची बाब समोर आली. शाळेतील शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच प्रशासकीय कामकाजाचीही तपासणी करण्यात आली. या वेळी सहाय्यक प्रशासकीय अधिकारी सुरेश उचाळे उपस्थित होते. तपासणीदरम्यान शालेय दप्तरातील अनेक नोंदी अपूर्ण असल्याचे आढळले. मागील वर्षी पर्यवेक्षिका आणि क्रीडा शिक्षकांनी शेरापुस्तकात नोंदी केल्या असल्या तरी त्यावर दिनांक नमूद करण्यात आले नव्हते. पालक सभेच्या वहीतही केवळ पालकांच्या सह्या असून बैठकीतील चर्चेचा किंवा निर्णयांचा कोणताही तपशील नोंदविलेला नसल्याचे दिसून आले.

सध्या या शाळेत इयत्ता पहिली ते सातवीपर्यंत एकूण २८७ विद्यार्थी शिक्षण घेत असून सात शिक्षक कार्यरत आहेत. मात्र, मुख्याध्यापकाचे पद दीर्घकाळापासून रिक्त असल्याने शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजावर त्याचा परिणाम होत असल्याची चर्चा आहे.

यावेळी अध्यक्ष अरुण राजवाडे यांनी पालकांशी संवाद साधून थेट लाभ हस्तांतरण योजनेअंतर्गत मिळणाऱ्या निधीतून विद्यार्थ्यांसाठी गणवेश, स्वेटर आणि आवश्यक शैक्षणिक साहित्याची खरेदी करण्याचे आवाहन केले. यावेळी पालकांनी परिसरातील विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेऊन या शाळेत दहावीपर्यंत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली.



## थोडक्यात पण महत्वाचे



### आणीबाणीच्या ५१ वर्षपूर्तीनिमित्त स्वयंसेवकाचा सत्कार

पुणे (आरंभ पर्व) : आणीबाणीच्या ५१ वर्षपूर्तीनिमित्त आयोजित कार्यक्रमात आणीबाणीच्या काळात तुरुंगवास भोगलेल्या ज्येष्ठ स्वयंसेवक संजयजी दाते यांचा भाजप पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी संजयजी दाते यांनी आणीबाणीच्या काळातील आपल्या आठवणींना उजाळा देत त्या काळातील अनुभव उपस्थितांसमोर मांडले. लोकशाही मूल्यांच्या त्यांनी योगदान दिले. त्यांचा निश्चितपणे आम्हाला अभिमान आहे असे भाजपचे मंडलध्यक्ष विजय मते यांनी सांगितले.. पुणे महानगरपालिकेच्या नगरसेविका धनश्रीताई कोल्हे , धायरी शिवणे मंडळ अध्यक्ष विजय मते, नरसिंहभाऊ लगड , जिल्हा उपाध्यक्ष अनिलभाऊ मते, ओबीसी मोर्चा सरचिटणीस, पुणे शहर रमेशबापू गायकवाड यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

### कारागृह विभागात मोठे फेरबदल; ६ राजपत्रित अधिकाऱ्यांच्या बदल्या

मुंबई (आरंभ पर्व) : महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने कारागृह व सुधारसेवा विभागातील राजपत्रित अधिकाऱ्यांच्या सन २०२६ मधील सर्वसाधारण व विनंती बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. या आदेशानुसार राज्यातील सहा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदली व नव्या पदस्थापना करण्यात आल्या आहेत. शासन आदेशानुसार कोल्हापूर मध्यवर्ती कारागृहाचे उपअधीक्षक पांडुरंग शामराव भुसारे यांची परभणी जिल्हा कारागृह (वर्ग २) अधीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच तळोजा मध्यवर्ती कारागृहाचे उपअधीक्षक महादेव संभाजी पवार यांची ठाणे मध्यवर्ती कारागृहात बदली करण्यात आली आहे. प्रशासकीय स्तरावरही महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा कार्यालयातील स्वीय सहायक संदीप अशोकराव घसे यांची पुणे येथील कारागृह उपमहानिरीक्षक (पश्चिम विभाग) कार्यालयात नियुक्ती करण्यात आली आहे. कोल्हापूर मध्यवर्ती कारागृहातील प्रशासन अधिकारी अशोक वामनराव डेरे यांची नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात तर पुणे येथील कारागृह उपमहानिरीक्षक (पश्चिम विभाग) कार्यालयातील स्वीय सहायक रवींद्र किसनराव दिघे यांची ठाणे मध्यवर्ती कारागृहात प्रशासन अधिकारी म्हणून बदली करण्यात आली आहे. दरम्यान, विनंती बदली अंतर्गत दौलतराव जाधव तुरुंगाधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, पुणे येथील अतिरिक्त अधीक्षक हरिभाऊ शंकर मिंड यांची कल्याण जिल्हा कारागृह (वर्ग १) अधीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. शासनाने संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ कार्यमुक्त करून नव्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्याचे निर्देश दिले आहेत. निर्धारित मुदतीत रुजू न झाल्यास किंवा बदली आदेश रद्द करण्यासाठी दबाव टाकल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असा इशाराही आदेशात देण्यात आला आहे. गृह विभागाच्या या निर्णयामुळे राज्यातील कारागृह प्रशासनात नव्या जबाबदाऱ्यांचे वाटप होणार असून व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे.

### नव्या मालिकेतील दोन दूरध्वनी संचांच्या विक्रीला प्रारंभ




मुंबई (आरंभ पर्व) : कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित दूरध्वनी संच निर्मिती करणाऱ्या 'एआय प्लस' कंपनीने आपल्या नव्या 'नोव्हा २' मालिकेतील नोव्हा २ प्रो आणि नोव्हा २ निओ या दोन दूरध्वनी संचांच्या विक्रीला शुक्रवार (२६ जून)पासून प्रारंभ केला आहे. प्रथमच दूरध्वनी संच वापरणाऱ्या ग्राहकांपासून ते अधिक क्षमतेचा अनुभव घेऊ इच्छिणाऱ्या वापरकर्त्यांपर्यंत सर्वांच्या गरजा लक्षात घेऊन हे संच तयार करण्यात आले आहेत. हे दोन्ही संच शुक्रवारपासून दुपारी बारा वाजल्यापासून 'फ्लिपकार्ट' आणि निवडक विक्री केंद्रांवर उपलब्ध झाले आहेत. 'नोव्हा' मालिकेला ग्राहकांकडून मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादानंतर कंपनीने या दोन नव्या संचांची भर घातली आहे. विक्रीच्या पहिल्या दिवशी नोव्हा २ निओच्या ४ जीबी स्मरणक्षमता व १२८ जीबी संचयन क्षमतेच्या प्रकाराची किंमत १२ हजार ९९९ रुपये, तर ६ जीबी स्मरणक्षमता व १२८ जीबी संचयन क्षमतेच्या प्रकाराची किंमत १३ हजार ९९९ रुपये ठेवण्यात आली आहे. नोव्हा २ प्रोच्या ६ जीबी स्मरणक्षमता व १२८ जीबी संचयन क्षमतेच्या प्रकाराची सुरुवातीची किंमत १४ हजार ९९९ रुपये, तर ८ जीबी स्मरणक्षमता व १२८ जीबी संचयन क्षमतेच्या प्रकाराची किंमत १६ हजार ९९९ रुपये आहे. सर्व बँकांच्या धनादेश व पतपत्रांवर एक हजार रुपयांची सवलतही देण्यात आली आहे.

### निससचे चार हजार कोटी रुपयांचे बहुविध गुंतवणूक व्यासपीठ

मुंबई (आरंभ पर्व) : भारतातील स्थावर मालमत्ता क्षेत्रातील वाढत्या संधी लक्षात घेऊन निसस फायनान्सने चार हजार कोटी रुपयांचे बहुविध गुंतवणूक व्यासपीठ उभारण्याची घोषणा केली आहे. उत्पन्न देणाऱ्या आणि मूल्यवृद्धीची क्षमता असलेल्या स्थावर मालमत्तांमध्ये गुंतवणूक करण्यावर या व्यासपीठाचा भर असणार आहे. देशांतर्गत उद्योजक, संयुक्त अरब अमिरातीतील संस्थात्मक गुंतवणूकदार, कौटुंबिक गुंतवणूक संस्था तसेच उच्च संपत्तीधारकांना एकाच व्यासपीठावर आणण्याचा कंपनीचा प्रयत्न आहे. या व्यासपीठामध्ये विविध प्रकारच्या गुंतवणूक योजना आणि सहगुंतवणुकीची सुविधा उपलब्ध राहणार असून, 'निसस यिल्ड अँड ॲसेट मल्टिप्लायर फंड'चाही त्यात समावेश असेल. भूखंड विकास, जमिनीचे एकत्रीकरण, पुनर्विकास प्रकल्प तसेच विशेष प्रकारच्या स्थावर मालमत्ता व्यवहारांमध्ये या निधीची गुंतवणूक केली जाणार आहे. कंपनीला पुढील १८ ते २४ महिन्यांत पहिल्या टप्प्यातील निधी उभारणी पूर्ण करण्याची अपेक्षा असून, सप्टेंबर-ऑक्टोबर २०२६ पर्यंत पहिला टप्पा पूर्ण होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. एकूण निधीपैकी सुमारे ३० ते ४० टक्के गुंतवणूक संयुक्त अरब अमिरातीतील गुंतवणूकदारांकडून येण्याची शक्यता आहे. भारतात सुमारे २,५०० कोटी रुपयांचा निधी उभारण्याबरोबरच गिफ्ट सिटीमधूनही मोठ्या प्रमाणात भांडवल उभारण्याचे नियोजन आहे.

# खडकवासला मतदारसंघात शिवसैनिकांचा निर्धार

- संघटन बांधणीसाठी आक्रमक भूमिका घेण्याचा संकल्प
- शहराध्यक्ष वसंत मोरे यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी बैठक संपन्न





**पुणे (दै. आरंभ पर्व)**
शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या खडकवासला विधानसभा मतदारसंघातील शिवसैनिक व पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक उत्साहात पार पडली. बैठकीत मतदारसंघातील विकासकामे, स्थानिक अडीअडचणी, आगामी काळातील संघटनात्मक बांधणी आणि जनसंपर्क वाढविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी आगामी काळात निष्ठावंत शिवसैनिकांनी अधिक आक्रमकपणे जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून संघटना अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. बैठकीला पुणे शहरप्रमुख वसंततात्या मोरे, खडकवासला मतदारसंघाचे सहसंपर्कप्रमुख गजाननभाऊ थरकुडे, पुणे उपशहरप्रमुख भरतआबा कुंभारकर, पुणे जिल्हा उपप्रमुख महेशभाऊ मते, जिल्हा संघटक बुवा खाटपे, हवेली तालुकाप्रमुख तानाजी पवळे, युवासेना शहरप्रमुख राम थरकुडे, शिवसेना समन्वयक पेटकर साहेब, माजी पंचायत समिती सदस्य पोपटतात्या चोरगे, रविंद्र मुजमुले, निवृत्ती वावळ, उमेशदादा सुर्वे, महाराष्ट्र वाहतूक सेनेचे जिल्हाप्रमुख दत्ताभाऊ घुले, युवानेते राहुलदादा घुले, संतोष गोपाळ, नाना मरगळे, उपविभागप्रमुख अविनाश सरोदे, नितीन भामे, केतन शिंदे, ज्येष्ठ शिवसैनिक सुरेश भदे, शिवाजी शिर्के, शांताराम पडर, बाळासाहेब मंडलिक, सिद्धार्थ पोकळे, बाळासाहेब हनमघर, सुरेशभाऊ देशमुख, रमेश देसाई, आकाश बालवडकर, ह.भ.प. शंकर महाराज ढोणे, जितेंद्र सपकाळ, सचिनभाऊ काटे, सुभाषभाऊ शिंदे, अंकुश तोंडे, अमर कर्डिले, संतोष शिंदे यांच्यासह मोठ्या संख्येने निष्ठावंत शिवसैनिक उपस्थित होते. बैठकीत "शिवसेना ही शिवसैनिकांच्या संघर्षातून उभी राहिलेली संघटना आहे. काही व्यक्ती पक्ष सोडून गेल्याने विचार संपत नाहीत. अन्याय, अहंकार आणि विभाजनवादी राजकारणाविरोधातील लढा अधिक जोमाने सुरू ठेवत शिवसेनेची मशाल अधिक तेजाने प्रज्वलित ठेवण्याचा संकल्प" सर्व उपस्थितांनी व्यक्त केला. यावेळी खडकवासला विभागप्रमुख शिवाजी मते पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानत आगामी काळात संघटना अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येक शिवसैनिकाने सक्रियपणे काम करण्याचे आवाहन केले.

# मनपा शाळांमध्ये शिक्षक व मूलभूत सुविधांची गरज

## मुख्य सभेत काकासाहेब चव्हाण यांची मागणी



"मनपा शाळांमधील विद्यार्थ्यांना केवळ पोषण आहार आणि भौतिक सुविधा देऊन चालणार नाही. शिक्षकांची कमतरता दूर करून, मूलभूत सुविधा उपलब्ध करून आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर देऊन विद्यार्थ्यांची गुणवत्ता टिकवून ठेवणे हेच खऱ्या अर्थाने दर्जेदार शिक्षण आहे. गोरगरीब विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी महापालिकेने याकडे प्राधान्याने लक्ष द्यावे."

**— काकासाहेब चव्हाण. गटनेते, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभेमध्ये मनपा शाळांमधील शिक्षणाच्या गुणवत्तेचा प्रश्न उपस्थित करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे गटनेते काकासाहेब चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना केवळ पोषण आहार, दप्तर आणि भौतिक सुविधा देऊन चालणार नसून त्यांना दर्जेदार शिक्षण देणे ही महापालिकेची प्राथमिक जबाबदारी असल्याचे ठामपणे मांडले.

सभागृहात चर्चेदरम्यान बोलताना चव्हाण यांनी पुणे महानगरपालिकेच्या अनेक शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता असल्याचा मुद्दा उपस्थित केला. अनेक ठिकाणी कंत्राटी शिक्षकांच्या माध्यमातून शैक्षणिक कामकाज सुरू असून पूर्णवेळ शिक्षकांची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच काही शाळांमध्ये स्वच्छतागृहे, स्वच्छता व्यवस्था आणि इतर मूलभूत सुविधांचाही अभाव असल्याकडे त्यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

शालेय पोषण आहार विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी महत्त्वाचा असला तरी त्याचबरोबर गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे तितकेच आवश्यक असल्याचे सांगत, शिक्षकांवर शैक्षणिक कामांव्यतिरिक्त इतर प्रशासकीय जबाबदाऱ्यांचा ताण असला तरी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या गुणवत्तेशी तडजोड होता कामा नये, असे मत त्यांनी व्यक्त केले.

गोरगरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यासाठी शिक्षणाच्या गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य देणारे प्रभावी आणि कायमस्वरूपी शैक्षणिक धोरण राबविण्याची गरज असल्याचे चव्हाण यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना सक्षम शिक्षक, स्वच्छ व सुरक्षित वातावरण तसेच आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पुणे महानगरपालिकेने विशेष प्रयत्न करावेत, अशी मागणीही त्यांनी केली.

# नर्सिंग सेवेला हिमालया बेबीकेअरचा सलाम



**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**
भारताच्या सर्वाधिक विश्वासार्ह बेबीकेअर ब्रँडपैकी एक असलेल्या हिमालया बेबीकेअरला 'ट्रेन्ड नर्सेस असोसिएशन ऑफ इंडिया' कडून राष्ट्रपती भवनात आयोजित राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्कार सोहळ्यात सहभागी होण्यासाठी विशेष निमंत्रण देण्यात आले होते. या प्रतिष्ठित पुरस्कारांचे वितरण भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी हिमालया बेबीकेअरने पुरस्कारप्राप्त नर्सेसचा विशेष सत्कार करून त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेतली. रुग्णसेवा, मातृत्व काळजी आणि नवजात बालकांच्या आरोग्य संवर्धनात नर्सेसची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते. अनेकदा पडद्यामागे राहून अथक परिश्रम करणाऱ्या या आरोग्यसेविकांचे योगदान समाजासमोर आणण्याचा प्रयत्न हिमालया बेबीकेअरने या उपक्रमातून केला आहे. देशभरातील विविध रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये आणि आरोग्य संस्थांमध्ये १० ते २५ वर्षे सेवा बजावणाऱ्या नर्सेसचा यामध्ये विशेष सन्मान करण्यात आला. त्यांच्या समर्पणाची कदर म्हणून कौतुक समारंभ, सन्मानपत्र वितरण आणि विशेष भेटवस्तू देण्यात आल्या.

## एकल माता दिनानिमित्त सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयात विशेष उपक्रम



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
आंतरराष्ट्रीय एकल माता दिनानिमित्त २३ जून २०२६ रोजी सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयात एकल महिलांच्या सन्मान, सुरक्षितता व सक्षमीकरणाच्या उद्देशाने विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला एकल महिला तसेच नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमामध्ये विविध शासकीय योजनांची माहिती, आयुष्मान भारत कार्ड नोंदणी व मार्गदर्शन तसेच मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या माध्यमातून एकल महिलांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासह त्यांच्या आरोग्याविषयी जनजागृती करण्यात आली.


यावेळी माजी उपमहापौर ॲड प्रसन्नदादा जगताप,सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाचे अध्यक्ष सचिन मोरे , नगरसेवक श्रीकांत जगताप, हरिदास चरवड, ज्योती गोसावी,कोमल नवले, जयश्री भूमकर यांच्यासह अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने एकल महिला उपस्थित होत्या.

महिलांच्या सन्मान, सुरक्षितता आणि आत्मनिर्भरतेसाठी अशा प्रकारचे उपक्रम महत्त्वाचे असून, समाजात महिलांच्या सक्षमीकरणासाठी ते निश्चितच प्रेरणादायी ठरत असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# धनश्री कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित्त रेशन कार्ड शिबिर संपन्न

### साडेपाचशे नागरिकांची नोंदणी; वाढदिवस साधेपणाने साजरा





**पुणे (दै. आरंभ पर्व)**
प्रभाग क्रमांक ३३ च्या कार्यक्षम नगरसेविका सौ. धनश्री दत्तात्रय कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित्त कोल्हेवाडी येथील जनसंपर्क कार्यालयात रेशन कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रेशन कार्डमध्ये नाव नसलेल्या नागरिकांची तसेच नवीन रेशन कार्डसाठी अर्ज करू इच्छिणाऱ्या नागरिकांची नोंदणी यावेळी करण्यात आली. सुमारे साडेपाचशे नागरिकांनी शिबिराचा लाभ घेतला असून त्यांच्या रेशन कार्डसंदर्भातील अर्ज दाखल करण्यात येणार आहेत. तसेच विद्यमान रेशन कार्डमध्ये नाव समाविष्ट नसलेल्या नागरिकांचीही नोंदणी करण्यात आली. नगरसेविका धनश्री कोल्हे यांचा वाढदिवस सामाजिक बांधिलकी जपत साधेपणाने साजरा करण्यात आला. त्यांना शुभेच्छा देण्यासाठी खडकवासला, कोल्हेवाडी व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली. यावेळी नगरसेवक सुभाष नाणेकर, महाराष्ट्र ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव दत्ताभाऊ कोल्हे, मंडल अध्यक्ष विजय मते, युवा मोर्चा अध्यक्ष निखिल धावडे ,ओबीसी मोर्चा शहर सरचिटणीस रमेशबापू गायकवाड, खडकवासल्याचे माजी सरपंच विजय कोल्हे, उमेश सरपाटील, अभिजित धावडे,महिला मोर्चा मंडल अध्यक्ष सौ.मनीषा मोरे,जिल्हा उपाध्यक्ष अनिल मते, तुषार पोकळे, राजू कुटे,गणेश गवांडे,नीलिमा गवांडे,

सायली भोसले यांच्यासह अनेक मान्यवर व पदाधिकाऱ्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना नगरसेविका धनश्री कोल्हे म्हणाल्या, "नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने आवाज उठविण्याचा प्रयत्न केला जाईल. प्रभागातील विविध समस्या महापालिकेच्या स्तरावर मांडून त्या सोडविण्यासाठी पुढील काळात अधिक प्रयत्नशील राहणार आहे. स्वच्छतागृहे, मनपा शाळांची दुरुस्ती, स्वच्छ पाणीपुरवठा आणि दर्जेदार रस्त्यांसाठी विशेष पाठपुरावा केला जाईल." तर दत्ताभाऊ कोल्हे यांनी सांगितले की, "प्रभागासाठी शुद्ध पाणीपुरवठा योजनेसाठी निधी मंजूर झाला असून लवकरच नागरिकांना शुद्ध व नियमित पाणीपुरवठा उपलब्ध करून दिला जाणार आहे."

# वरून पाऊस, खाली ट्रॅफिक; सिंहगड रस्त्यावरील नागरिकांची प्रचंड तारांबळ


"पावसाळ्यात तसेच नऱ्हे, धायरी परिसरात व इतर ठिकाणी गर्दीच्या वेळेत वाहतूक कोंडीची समस्या वारंवार निर्माण होते. गर्दीच्या वेळेत प्रमुख चौकांमध्ये अतिरिक्त वाहतूक कर्मचारी आणि वॉर्डन नियुक्त केल्यास नागरिकांची होणारी गैरसोय टाळता येईल."

**- राजू प्रभाकर कुटे, भाजप प्रभागाध्यक्ष, प्रभाग क्र. ३४**

सिंहगड रोड परिसरात नांदेड फाटा ते कॅनल रोड परिसरात प्रचंड ट्राफिक होते. पोलीस कर्मचारी यांनी गर्दीच्या वेळी वाहतूक नियंत्रण करणे गरजेचे आहे.. या भागातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी कॅनल रोड रस्ता होणे गरजेचे आहे.

**- रुपेश घुले पाटील, शहर उपाध्यक्ष, राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी शरदचंद्र पवार**





**पुणे (दै. आरंभ पर्व)**
शहरात मान्सूनचे आगमन झाले असले तरी पहिल्याच दमदार पावसाने सिंहगड रस्ता परिसरातील नागरिकांचे मोठे हाल झाले. एकीकडे मुसळधार पाऊस तर दुसरीकडे रस्त्यांवरील वाहतूक कोंडी यामुळे नागरिक, विद्यार्थी आणि नोकरदार वर्गाला मोठा मनस्ताप सहन करावा लागला.

सिंहगड रस्ता परिसरातील धायरी फाटा, नांदेड गाव,नऱ्हे, वडगाव आणि अन्य प्रमुख चौकांमध्ये तासनतास वाहतूक कोंडी झाली होती. अनेक ठिकाणी रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहनांचा वेग मंदावला आणि त्याचा परिणाम संपूर्ण वाहतूक व्यवस्थेवर झाला. शाळा आणि महाविद्यालयातून घरी परतणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच शहरात ये-जा करणाऱ्या चाकरमान्यांना याचा मोठा फटका बसला. वाहतूक कोंडीमुळे पीएमपीएमएलच्या बसही जागोजागी अडकून पडल्या होत्या. परिणामी प्रवाशांना वेळेवर गंतव्यस्थानी पोहोचणे अशक्य झाले. अनेक वाहनचालकांना तासन्तास रस्त्यावरच थांबावे लागले. दरम्यान, गर्दीच्या वेळी वाहतूक नियंत्रणासाठी आवश्यक मनुष्यबळ कमी पडत असल्याचे चित्र दिसून आले. त्यामुळे वाहतूक व्यवस्थापनात अधिक प्रभावी नियोजनाची गरज असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. या वाहतूक कोंडीमुळे सिंहगड रस्ता परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

प्रभाग क्रमांक ३४ चे भाजप प्रभागाध्यक्ष राजू कुठे यांनी गर्दीच्या वेळेत नऱ्हे, धायरी आणि वडगाव परिसरातील प्रमुख चौकांमध्ये वाहतूक वॉर्डन व अतिरिक्त कर्मचारी नियुक्त करण्याची मागणी केली आहे. यामुळे वाहतुकीचे नियोजन अधिक प्रभावी होऊन नागरिकांना दिलासा मिळू शकतो, असे त्यांनी सांगितले.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
शुक्रवार, दि. २६ जून २०२६





## अक्षय इंगळे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन



- रक्तदान शिबीर उपक्रमात प्रथमच लकी ड्रॉ ही काढला जाणार

**नऱ्हे, पुणे (दै. आरंभ पर्व)**
नऱ्हे गावचे माजी उपसरपंच श्री. अक्षय सुभाष इंगळे यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवार, दि. २७ जून २०२६ रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक बांधिलकी जपत दरवर्षीप्रमाणे यंदाही हा उपक्रम राबविण्यात येत असून परिसरातील नागरिक, युवक व रक्तदाते बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. सकाळी ८.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत झील कॉलेज चौक, नऱ्हे, पुणे येथे हे रक्तदान शिबिर पार पडणार आहे. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. एका रक्तदात्याच्या योगदानामुळे अनेकांना नवजीवन मिळू शकते. त्यामुळे अधिकाधिक नागरिकांनी या सामाजिक उपक्रमात सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

यावेळी रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यांचा सन्मान यावेळी करण्यात येणार आहे. प्रथमच या रक्तदान शिबिर उपक्रमांमध्ये लकी ड्रॉ काढण्यात येणार असून त्यामध्ये इलेक्ट्रिक स्कूटर (EV), वॉशिंग मशीन, कूलर, मिक्सर आणि ओव्हन टोस्टर यांसारख्या आकर्षक भेटवस्तू जिंकण्याची संधी उपलब्ध होणार आहे. "रक्तदान करा... जीवन वाचवा!" या संदेशातून मानवतेची सेवा करण्याची संधी नागरिकांना मिळणार असून या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. रक्तदान करण्यासाठी संपर्क:- ८६६८४२०३००, ८८०५४४१२१०, ८६२३०६६०६५

# उत्तम नगर शिवणे व परिसरातील नागरिकांना ट्रॅफिक जाममधून दिलासा

## कॅनॉल रस्त्यासाठी पहिल्या टप्प्यात २.५ कोटी मंजूर : नगरसेवक सुभाष नाणेकर यांची पुणे महानगरपालिकेत तातडीची बैठक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
शिवणे, उत्तम नगर , कोंढवे धावडे ,कोपरे देशमुखवाडी आणि परिसरातील नागरिकांना दररोज भेडसावणाऱ्या वाहतूक कोंडीच्या समस्येवर मोठा दिलासा मिळणार आहे. सुमारे ६ किलोमीटर लांबीच्या कॅनॉल रस्त्याच्या विकासकामासाठी पहिल्या टप्प्यात २ कोटी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असून हे काम टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती नगरसेवक सुभाष नाणेकर यांनी दिली.



शिवणे देशमुखवाडी ते शिवणे पूल या मार्गावर वाहनांची वाढती संख्या आणि अपुऱ्या रस्त्यांमुळे दररोज वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. यामुळे नागरिकांचा वेळ व इंधन मोठ्या प्रमाणात वाया जात आहे. आज सकाळी झालेल्या वाहतूक कोंडीनंतर नगरसेवक सुभाष नाणेकर यांनी तातडीने प्रशासकीय स्तरावर पाठपुरावा सुरू केला.

यासंदर्भात महापालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्यात आली. बैठकीस सहाय्यक आयुक्त ओमप्रकाश दिवटे तसेच मुख्य अधीक्षक अभियंता राजेश बनकर उपस्थित होते. यावेळी कॅनॉल रस्त्याच्या कामाचा आराखडा, निधीची उपलब्धता आणि कामाची अंमलबजावणी याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

> "सुमारे ६ किलोमीटर लांबीचा कॅनॉल रस्ता टप्प्याटप्प्याने विकसित करण्यात येणार आहे. या कामासाठी पहिल्या टप्प्यात २ कोटी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असून नागरिकांना वाहतूक कोंडीमधून कायमस्वरूपी दिलासा मिळावा, यासाठी हे काम प्राधान्याने पूर्ण करण्यात येईल."
> **- सुभाष नाणेकर, नगरसेवक**

नगरसेवक नाणेकर यांनी स्वतःच्या स्थानिक विकास निधीतून ५० लाख रुपये उपलब्ध करून दिले असून महापालिकेच्या मुख्य अंदाजपत्रकातून २ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे पहिल्या टप्प्यात एकूण २.५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. या निधीतून रस्त्याच्या कामाची सुरुवात करण्यात येणार असून उर्वरित काम पुढील टप्प्यांमध्ये पूर्ण केले जाणार आहे.

कॅनॉल रस्ता पूर्ण झाल्यानंतर शिवणे, उत्तम नगर कोंढवे धावडे, कोपरे देशमुखवाडी, किरकटवाडी आणि आसपासच्या परिसरातील वाहतूक सुरळीत होण्यास मोठी मदत होणार आहे. त्यामुळे नागरिकांचा प्रवासाचा वेळ कमी होऊन इंधनाचीही बचत होणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



## वडज धरण परिसरातील शेतीपंपांच्या केबल चोरणाऱ्या तिघांना अटक

- साडेचार लाख रुपये किंमतीची केबल हस्तगत- जुन्नर पोलिसांची कारवाई

**जुन्नर(आरंभ पर्व) :** जुन्नर पोलिसांनी कुसुर ता. जुन्नर जवळील वडज धरण परिसरातील शेतकऱ्यांच्या शेती पंपाची केबल चोरणाऱ्या तीन चोरट्यांना स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून ४ लाख ६२ हजार ५०० रुपये किमतीची १ हजार ८५० मीटर लांबीची केबल जप्त करण्यात आली आहे, अशी माहिती पोलीस निरीक्षक दत्तात्रेय गुंड यांनी दिली. याप्रकरणी राजेंद्र गणपत भगत यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार सुनील सुरेश पवार (वय २५), सुनील बाळू हेलम (वय २९), अंकुश रघुनाथ मुकणे (वय ३०) सर्व रा. वाजळे, ता. मुरबाड, जि. ठाणे यांच्याविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. वडज धरणाच्या पाणलोट क्षेत्रातून धामणखेल, खानापूर, कुसुर व वडज येथील शेतकऱ्यांनी सिंचनासाठी पाईपलाइन केल्या आहेत. मध्यरात्रीच्या सुमारास सदर आरोपी केबल कापून त्याचे बंडल करत असताना स्थानिकांनी पाहिले. चोरट्यांनी कोयता व चाकूचा धाक दाखवून पळण्याचा प्रयत्न केला असता यावेळी जुन्नर पोलिसांनी सतर्कता दाखवत त्यांच्या मुसक्या आवळल्या. शेतकऱ्यांमध्ये वारंवार होणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे संताप असून अशा गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा पोलिस निरीक्षक दत्तात्रेय गुंड यांनी दिला आहे.

## योग शिबीर उत्साहात संपन्न



**धायरी (दै. आरंभ पर्व)**
आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने मा. नगरसेविका सौ. कोमलसारंग नवले व महाराष्ट्र योग शिक्षक संघ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "योग शिबीर" कार्यक्रम सुवासिनी मंगल कार्यालय, धायरी फाटा, पुणे येथे उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला. या योग शिबिरात परिसरातील अनेक नागरिक, युवक-युवती तसेच ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून विविध योगासने व प्राणायामाचा लाभ घेतला. योगाचे महत्त्व, निरोगी जीवनशैली आणि मानसिक आरोग्य याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमात सहभागी झालेल्या सर्व योगसाधकांना प्रशस्तीपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. उपस्थितांनी नियमित योगाभ्यास करण्याचा संकल्प करून "योग करूया, निरोगी आयुष्य घडवूया" हा संदेश समाजापर्यंत पोहोचवण्याचा निर्धार व्यक्त केला. या यशस्वी कार्यक्रमासाठी मा. नगरसेवक श्री. बाळासाहेब नवले, उद्योजक बाळासाहेब पोकळे, नगरसेविका सौ. कोमल सारंग नवले तसेच सौ. चंद्रज्योती दळवी (पुणे जिल्हा अध्यक्ष, महाराष्ट्र योग शिक्षक संघ) यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हे योग शिबिर पार पडले.

## डॉ. जनार्दन भोसले यांना राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
बावधन ता. वाई येथील साहित्यिक, कवी डॉ.जनार्दन पांडुरंग भोसले यांना राज्यस्तरीय छत्रपती शिवाजी महाराज साहित्य पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

डॉ. जनार्दन भोसले यांना आत्तापर्यंत २३ राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाले आहेत. आणि २ राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाले आहेत. तसेच 3 आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित केले आहे.

डॉ. जनार्दन भोसले यांच्या साहित्याच्या क्षेत्रातील या कार्याची दखल साहित्यिक, समीक्षक, रसिक वाचक या सर्वांनी घेतलेली आहे. या पार्श्वभूमीवर के. एस. आय. पब्लिकेशन संस्था आणि विद्यानिकेतन सामाजिक व शैक्षणिक संस्था महाराष्ट्र राज्य यांच्याकडून त्यांना 'राज्यस्तरीय छत्रपती शिवाजी महाराज साहित्य पुरस्कार' प्रधान करण्यात आला. हा पुरस्कार अन्य पुरस्कारप्राप्त



साहित्यिकांच्या सोबतच प्रा. डॉ. यादव यांनाही के. एस. आय. पब्लिकेशन संस्था आणि विद्यानिकेतन सामाजिक व शैक्षणिक संस्था महाराष्ट्र राज्य यांनी संयुक्तपणे लोकमान्य टिळक ग्रंथालय, वाई (जि. सातारा) येथील दिनांक ७ जून २०२६ रोजी आयोजित केलेल्या '५ व्या राज्यस्तरीय मिरग नक्षत्र कवी संमेलनात' निमंत्रित प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. या प्रसंगी व्यासपीठावर संमेलनाचे अध्यक्ष मा. नागनाथ श्रीपती डोलारे (नवीन पनवेल ), उद्घाटक मा. श्री. विलास धोंडीराम खरात , स्वागताध्यक्ष मा. शशिकांत कोचळे (वाई), संमेलनाचे मुख्य कार्यकारी अधिकारी कवी सरकार मा. श्री. विलास पाटील(इंगळी), मार्गदर्शक मा. डॉ. श्रीकांत श्रीपती पाटील( घुनकी), लक्ष्यतारा न्यूज चैनलचे संपादक श्री. सचिन विष्णू वाघमारे (आटपाडी) इत्यादी निमंत्रित मान्यवर साहित्यिक उपस्थित होते. तर सभा मंडपात महाराष्ट्राच्या पुणे, मुंबई, कोकण,गोवा, मराठवाडा, सोलापूर, सातारा, सांगली, अहमदनगर, कोल्हापूर अशा विविध भागातून आलेले पुरस्कारप्राप्त साहित्यिक, संमेलनातील सहभागी कवी, कथाकार, कादंबरीकार, पत्रकार आणि रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रमुख निमंत्रित पाहुण्यांच्या शुभहस्ते राज्यस्तरीय छत्रपती शिवाजी महाराज साहित्य पुरस्कार प्रदान करताना आमचे मित्र अजित नलगे, बाळकृष्ण राजपुरे ,आप्पा भोसले यांचे विशेष सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन सौ. विद्या थोरात-काळे (अंधेरी) व मा. दिपक पवार (रुकडी) यांनी अत्यंत उत्कृष्टपणे केले. शेवटी निमंत्रित प्रमुख पाहुणे, पुरस्कार प्राप्त साहित्यिक, कवी संमेलनातील सहभागी कवी, पत्रकार आणि श्रोते या सर्वांचे मा. संमेलनच्या आयोजकांनी आभार मानले व संमेलनाची सांगता केली.

## डायनॅमिक भारत २०४७ : श्री. निलेश ओक यांचे व्याख्यान २८ जून रोजी




**पुणे (आरंभ पर्व) :** भारताच्या प्राचीन इतिहासाचा अभ्यास आणि त्यातून भविष्यातील भारताची दिशा याविषयी मार्गदर्शन करणारे "डायनॅमिक भारत २०४७" हे विशेष व्याख्यान रविवारी, २८ जून २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता कर्वेनगर येथील पंडित फार्म्स, डी.पी. रोड येथे आयोजित करण्यात आले आहे. नागरिक सोशल फाउंडेशन आणि ॲम्बिशन्स कॉमर्स इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात प्राचीन इतिहासाचे अभ्यासक व संशोधक निलेश ओक मार्गदर्शन करणार आहेत. रामायण आणि महाभारत ही केवळ महाकाव्ये किंवा काल्पनिक कथा नसून ती भारतीय इतिहासाच्या प्रदीर्घ परंपरेचा भाग असल्याचा दृष्टिकोन मांडत, इतिहासाचे चिंतन वर्तमान आणि भविष्य घडविण्यासाठी कसे उपयुक्त ठरू शकते यावर ते भाष्य करणार आहेत.

## राष्ट्रनिर्माणात युवकांचा सहभाग वाढविण्यासाठी पुढाकार

- प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**
भारतीय जनता युवा मोर्चातर्फे राज्यभर राबविण्यात येत असलेल्या युवाशक्ती जागर यात्रे दरम्यान भाजयुमोचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांचा शिवजन्मभूमी जुन्नर येथे दौरा आयोजित करण्यात आला होता. यावेळी त्यांनी युवकांशी थेट संवाद साधत विविध विषयांवर मार्गदर्शन करून संघटनात्मक



कामकाजावर चर्चा केली. याप्रसंगी भाजप नेत्या आशा बुचके, युवा मोर्चाचे पुणे जिल्हाध्यक्ष गणेश कवडे, तालुकाध्यक्ष संतोष नाना खैरे, पंचायत समिती सदस्य संजय वऱ्हाडी, रोहित परदेशी, सचिन खत्री, अनिल मेहेर, दीपेश परदेशी आदींसह भाजपा विश्व हिंदू परिषद बजरंग दल पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कृष्णराज महाडिक म्हणाले, राज्य शासनाकडून पर्यावरण संरक्षण आणि ग्लोबल वॉर्मिंगच्या आव्हानांवर मात करण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात असून, ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात भारत आज जगातील अग्रगण्य देशांच्या यादीत आपले स्थान अधिक बळकट करत आहे.

ते पुढे म्हणाले, केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची र युवकांना माहिती देणे, रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन करणे, कौशल्य विकास आणि उद्योजकतेस प्रोत्साहन देणे हा या दौऱ्याचा प्रमुख उद्देश आहे.

## एसअँडपी ग्लोबलकडून भारती एअरटेलच्या पतमानांकनात वाढ

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**
भारतातील आघाडीची दूरसंचार सेवा देणारी भारती एअरटेल लिमिटेड कंपनीला जागतिक पतमानांकन संस्था एसअँडपी ग्लोबल रेटिंग्सकडून मोठा दिलासा मिळाला आहे. संस्थेने कंपनीचे दीर्घकालीन पतमानांकन 'बीबीबी'वरून 'बीबीबी+' असे वाढवले असून कंपनीबाबतचा स्थिर दृष्टिकोन कायम ठेवला आहे. हे सुधारित मानांकन २४ जून २०२६ पासून लागू करण्यात आले आहे. याचबरोबर कंपनीच्या हमीविरहित वरिष्ठ कर्जावरील पतमानांकनातही समान वाढ करण्यात आली आहे.

कंपनीची सातत्याने वाढणारी उलाढाल, मजबूत रोख प्रवाह, शिस्तबद्ध आर्थिक व्यवस्थापन तसेच भारत आणि आफ्रिकेतील व्यवसायाची भक्कम कामगिरी यामुळे हे मानांकन वाढविण्यात आल्याचे संस्थेने नमूद केले आहे. त्यामुळे भारती एअरटेलची दीर्घकालीन वाढ आणि आर्थिक स्थैर्य अधिक मजबूत झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

# गुंजाळवाडीला कॅन्सर सुरक्षा ग्राम योजनेचा शुभारंभ

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**
न्यु इंडिया एश्योरन्स कंपनीचे विमा प्रतिनिधी राजेंद्र पांडुरंग वाळुंज यांचे माध्यमातून दि .न्यु इंडिया एश्योरन्स कंपनीच्या सहकार्याने गुंजाळवाडी-आर्वी ता.जुन्नर येथे पोर्टल मोबाईल कार्यालयाचे उदघाटन तसेच कॅन्सर सुरक्षा ग्राम योजनेचा प्रारंभ करण्यात आला. गुंजाळवाडी-आर्वी येथील श्रीराम मंदिरात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड.राम कर्पे होते. न्यु इंडिया एश्योरन्स कंपनीचे उप महाप्रबंधक एच. बी. अरुणकुमार, रिजिनल मॅनेजर, प्रेमचंद मोरे ,डिव्हिजनल मॅनेजर शैलेंद्र शिंदे, सुफी संत सुफीसंत पीर कबीर,लतीफभाई पटेल,जिल्हा परिषद सदस्य नेहा




पाटे, एलआयसीचे डोके,भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष विजय पवार, विशाल जुन्नर पतसंस्थेचे संचालक दिपक सोनवणे तसेच अनिल शेलार, धनेशशेठ शेलोत, ॲड. राजेंद्र बेंडे पाटील, आणि ग्रामस्थ आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते. यावेळी गुंजाळवाडी ग्रामस्थांचा मेळावा घेऊन कॅन्सर आजारावर मार्गदर्शन करण्यात आले. विमा प्रतिनिधी राजेंद्र वाळूंज यांनी प्रास्तविक केले. प्रेमचंद मोरे यांनी कॅन्सर पॉलीसीचे महत्व व आवश्यक याचे महत्व समजावून दिले. गाव कॅन्सर मुक्त झाल्यास मिळणारे फायदे समजावून सांगितले. नेहा पाटे, विजय पवार यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या दिल्या तसेच राजेद्र वाळुंज यांना सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. गुरुवर्य लतीफभाई पटेल . ॲड.राम कर्पे, एच. बी. अरुणकुमार यांनी मार्गदर्शन केले. धडाडीचे विमा प्रतिनिधी राजेंद्र वाळुंज यांचे कार्य तसेच ह्या उपक्रमाबद्दल कौतुक केले. कार्यक्रमास गुंजाळवाडी ग्रामस्थांचा चांगला प्रतिसाद मिळाला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजेन्द्र वाळुंज व मित्र परिवार तसेच दि न्यु इंडिया एश्योरन्स कंपनीचे पुणे रिजिनल ऑफिस शैलेंद्र शिदे , .कासारवाडी . राजगुरूनगर कार्यालय,. वाळुंज परिवार व गुंजाळवाडी ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.अँड. स्वप्नील वाळूंज यांनी आभार मानले.

## ग्रामपंचायत लिंगाळी, ता. दौंड, जि. पुणे

**B1 पेपर नोटीस ३ सन २०२६-२७**

ग्रामपंचायत लिंगाळी, ता. दौंड जि. पुणे यांच्याकडून खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पद्धतीने (दोन सीलबंद) लिफाफा पद्धतीने जिल्हा परिषदेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणी कृत ठेकेदारकडून माघविण्यात येत आहे. कोऱ्या निविदेचा नमुना ग्रामपंचायत लिंगाळी, ता. दौंड जि. पुणे २६/०६/२०२६ ते ०२/०७/२०२६ कालावधीत कामकाझाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजे पर्यन्त पोस्टाने / समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्वीकारावी जातील. सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी / ग्रामपंचायत सोई नुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा विक्री करण्याचा कालावधी दिनांक | निविदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र. १ मेरगळवाडी अंतर्गत बंदिस्त गटर करणे. | २१०८६५/- | २६/०६/२०२६ ते ०२/०७/२०२६ | ०/- | सूट सु. बे. वर्ग ५. |

निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे : १) कोणतेही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत कार्यालयात रोख भरल्यानंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कमी करणे या संदर्भात आवश्यक त्या अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) जिल्हा परिषदेकडील रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट ची प्रत जोडण्यात यावी. ४) जी. एस. टी. रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट ची प्रत जोडण्यात यावी. ५) पॅन कार्ड ची प्रत जोडण्यात यावी ६) आधार कार्ड ची प्रत जोडण्यात यावी. ७) या पूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ८) इसारा रक्कम ग्रामपंचायत नावे धनादेश / डी. डी. जोडण्यात यावा. ९) सी. ए. कडील बीड कपॅसिटी दाखला जोडण्यात यावा.

सही/-
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत लिंगाळी, ता. दौंड, जि. पुणे

सही/-
प्रशासक
ग्रामपंचायत लिंगाळी, ता. दौंड, जि. पुणे

## थोडक्यात पण महत्वाचे




### कलर्स मराठीचा 'वटपौर्णिमा विशेष महासंगम' प्रेक्षकांच्या भेटीला

पुणे (आरंभ पर्व) : कलर्स मराठीवरील लोकप्रिय मालिका 'मी जिंकून घेईन सारं' आणि 'मोहिनी – प्रेमाची फिल्मी कहाणी' यांचा बहुप्रतीक्षित 'वटपौर्णिमा विशेष महासंगम' प्रेक्षकांसाठी मनोरंजनाची अनोखी पर्वणी घेऊन येत आहे. २९ जून ते १ जुलै दरम्यान सलग तीन दिवस संध्याकाळी ७ वाजता प्रसारित होणाऱ्या या विशेष भागांमध्ये सणाचा उत्साह, कौटुंबिक नात्यांचे भावविश्व, रहस्य, थरार आणि नाट्यमय घडामोडींचा संगम पाहायला मिळणार आहे. वटपौर्णिमेच्या पवित्र सणाच्या पार्श्वभूमीवर उलगडणाऱ्या या कथानकात केवळ पारंपरिक वटपूजनच नव्हे, तर सुड, कारस्थानं आणि अनपेक्षित संकटांचे सावटही प्रेक्षकांना खिळवून ठेवणार आहे. 'कलर्स मराठीची आजची सावित्री' ही संकल्पना अधोरेखित करत, संकटांशी दोन हात करणाऱ्या आणि आपल्या कुटुंबासाठी खंबीरपणे उभ्या राहणाऱ्या स्त्रियांची प्रेरणादायी कथा या महासंगमातून उलगडणार आहे.


### 'खेत बचाओ अभियान' कार्यक्रम उरुळी कांचन येथे उत्साहात संपन्न

उरुळी कांचन (आरंभ पर्व) : उरुळी कांचन येथे आयोजित करण्यात आलेल्या 'खेत बचाओ अभियान' कार्यक्रमात कृषी विज्ञान केंद्र, बारामतीचे शास्त्रज्ञ डॉ. दाते यांनी शेतकऱ्यांना आधुनिक व शाश्वत शेतीविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास मंडळ कृषी अधिकारी गणेश धस, उपकृषी अधिकारी रामदास डावखर, सहाय्यक कृषी अधिकारी शंकर चव्हाण, राजेंद्रजी भोसेकर, यशवंत सहकारी साखर कारखान्याचे संचालक संतोष कांचन, नियोजन समिती सदस्य अलंकार कांचन, प्रशासक सरपंच मिलिंद जगताप, माजी कृषी अधिकारी पुरुषोत्तम काकडे तसेच ग्रामस्थ, पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. यावेळी डॉ. दाते यांनी उस पिकामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित तंत्रज्ञानाचा वापर ही काळाची गरज असल्याचे सांगितले. तसेच जमिनीचे आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी नियमित माती परीक्षण करण्याचे आणि त्या अहवालानुसारच रासायनिक खतांचा संतुलित वापर करण्याचे आवाहन केले. याशिवाय केंद्र व राज्य शासनाच्या विविध कृषी योजनांची सविस्तर माहिती देत शेतकऱ्यांनी त्यांचा लाभ घ्यावा, असे मार्गदर्शनही त्यांनी केले. कार्यक्रमात शाश्वत शेती, उत्पादन खर्चात बचत, जमिनीची सुपीकता वाढविणे आणि पर्यावरणपूरक शेती पद्धतींचे महत्त्व यावर सखोल चर्चा करण्यात आली. उपस्थित शेतकऱ्यांनी मार्गदर्शनाचा लाभ घेत विविध शंकांचे निरसन करून घेतले. आधुनिक शेतीसाठी उपयुक्त माहिती मिळाल्याने हा कार्यक्रम शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त, ज्ञानवर्धक आणि प्रेरणादायी ठरला.

### फ्लिपकार्ट मिनिट्सचा दोन वर्षांत १,००० सूक्ष्म पूर्तता केंद्रांचा टप्पा

पुणे (आरंभ पर्व) : देशातील आघाडीच्या ऑनलाइन विक्री व्यासपीठांपैकी एक असलेल्या फ्लिपकार्टच्या 'फ्लिपकार्ट मिनिट्स' या झटपट वितरण सेवेनं दोन वर्षांपेक्षा कमी कालावधीत १,००० सूक्ष्म पूर्तता केंद्रांचा टप्पा गाठला आहे. ऑगस्ट २०२४ मध्ये सुरू झालेली ही सेवा आता १३० हून अधिक शहरे आणि ८,००० पेक्षा जास्त टपाल क्रमांक क्षेत्रांपर्यंत पोहोचली असून, मागील वर्षाच्या तुलनेत मागण्यांमध्ये तब्बल पाचपट वाढ नोंदविण्यात आली आहे. कंपनीच्या माहितीनुसार, मोठ्या शहरांसह दुसऱ्या आणि तिसऱ्या श्रेणीतील शहरांमध्येही झटपट वितरण सेवेला मोठा प्रतिसाद मिळत आहे. विशेषतः या बाजारपेठांमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत ४२ पट वाढ नोंदवली गेली असून, नव्या शहरांमध्ये विस्तार आणि स्थानिक पातळीवरील उपलब्धता यामुळे या वाढीस चालना मिळाली आहे. फ्लिपकार्ट समूहाचे वरिष्ठ उपाध्यक्ष हेमंत बद्री यांनी सांगितले की, १,००० सूक्ष्म पूर्तता केंद्रांचा टप्पा गाठणे हा महत्त्वाचा टप्पा असला तरी त्याहून महत्त्वाचे म्हणजे देशभरातील ग्राहक झटपट वितरण सेवेचा मोठ्या प्रमाणावर स्वीकार करत आहेत. अधिक व्यापक पोहोच, अधिक पर्याय आणि सोयीसुविधांमुळे या क्षेत्राच्या वाढीला आणखी गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. फ्लिपकार्ट मिनिट्सचे प्रमुख कुणाल गुप्ता यांनी सांगितले की, दैनंदिन गरजांची पूर्तता करण्यासाठी सुरू झालेली सेवा आता लाखो ग्राहकांच्या खरेदीच्या सवयींचा भाग बनली आहे.

### वनप्लस नॉर्ड बड्स ४ सादर; प्रगत तंत्रज्ञानासह ५४ तासांची बॅटरी




पुणे (आरंभ पर्व) : वनप्लसने आपल्या नॉर्ड मालिकेतील 'वनप्लस नॉर्ड बड्स ४' हे नवीन श्रवणयंत्र बाजारात आणले आहे. विद्यार्थी, तरुण व्यावसायिक आणि मनोरंजनप्रेमी ग्राहकांना लक्षात घेऊन विकसित करण्यात आलेल्या या उत्पादनात प्रगत ध्वनीरोधक तंत्रज्ञान, प्रभावी ध्वनीअनुभव आणि दीर्घकाळ टिकणारी बॅटरी देण्यात आली आहे. या श्रवणयंत्रांमध्ये ५२ डेसिबलपर्यंत बाह्य आवाज कमी करण्याची क्षमता देण्यात आली आहे. परिसरातील बदलत्या ध्वनीस्थितीनुसार ही यंत्रणा कार्यरत होत असल्याने गर्दीच्या ठिकाणी, प्रवासादरम्यान किंवा अभ्यासाच्या वेळी अधिक एकाग्रतेने संगीत आणि संभाषणाचा अनुभव घेता येतो. स्पष्ट संभाषणासाठी प्रत्येक श्रवणयंत्रात तीन अशा एकूण सहा ध्वनीग्राहकांचा वापर करण्यात आला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित प्रणालीच्या मदतीने वाऱ्याचा किंवा बाहेरील गोंगाटाचा परिणाम कमी करून संभाषणाची गुणवत्ता टिकवून ठेवली जाते, असा दावा कंपनीने केला आहे. ध्वनीगुणवत्तेसाठी १२ मिलिमीटर आकाराचे विशेष ध्वनीचालक बसविण्यात आले आहेत. याशिवाय त्रिमितीय ध्वनीअनुभवाची सुविधा देण्यात आल्याने संगीत, चित्रपट आणि संगणकीय खेळ अधिक वास्तववादी वाटतात. विविध ध्वनीसमायोजन पर्यायांमुळे वापरकर्त्यांना आपल्या पसंतीनुसार ध्वनीअनुभव बदलता येतो.

# हर्षदुहिता कलेक्टिव्ह : भारतीय संगीत परंपरेला नव्या युगाचा स्वर




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतीय शास्त्रीय संगीताची समृद्ध परंपरा आणि आधुनिक संगीत अभिव्यक्ती यांचा सुरेल संगम घडवत हर्षदुहिता कलेक्टिव्ह आज देशभरातील संगीतप्रेमींच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. भजन, सुफी संगीत, लोकधुना, गझल आणि आधुनिक संगीत रचना यांचे अनोखे मिश्रण सादर करणाऱ्या या समूहाने भारतीय संगीतविश्वात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

रामपूर आणि जयपूर घराण्यांच्या समृद्ध वारशातून प्रेरणा घेतलेल्या हर्षदुहिता कलेक्टिव्हचा संगीतप्रवास केवळ मनोरंजनापुरता मर्यादित नसून तो संस्कृती, परंपरा आणि आत्म-अभिव्यक्तीचा प्रवास आहे.

भारतीय शास्त्रीय संगीताच्या भक्कम पायावर उभा असलेला हा समूह आधुनिक काळातील श्रोत्यांशी संवाद साधत परंपरा आणि समकालीनतेत एक सुंदर पूल उभारतो. विशेष म्हणजे, आज ज्या फ्यूजन शैलीसाठी हर्षदुहिता कलेक्टिव्ह प्रसिद्ध आहे, ती कोणतीही आखणी करून तयार झालेली नाही. "वेगवेगळ्या शैली मिसळून फ्यूजन तयार करण्याचा आमचा कधीच हेतू नव्हता. आमच्या अनुभवांचा, परंपरांचा आणि संगीतप्रवासाचा तो नैसर्गिक परिणाम आहे," असे समूहाचे सदस्य सांगतात.

त्यांच्या सादरीकरणात पारंपरिक भजनांची भक्ती, सुफी संगीताची आध्यात्मिकता, लोकसंगीताची मातीशी नाळ आणि आधुनिक संगीताची ताजगी यांचा सुंदर मिलाफ अनुभवायला मिळतो. त्यामुळे त्यांचे प्रत्येक सादरीकरण हे श्रोत्यांसाठी एक भावनिक आणि संस्मरणीय अनुभव ठरते. हर्षदुहिता कलेक्टिव्हच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे लोकप्रिय दूरचित्रवाणी कार्यक्रम 'इंडियाज गॉट टॅलेंट'मध्ये उपांत्य फेरीपर्यंत मजल मारणे.

या व्यासपीठामुळे त्यांना राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळाली आणि त्यांचे संगीत देशभरातील लाखो श्रोत्यांपर्यंत पोहोचले. समूहाला त्यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मश्री महेंद्र कपूर पुरस्कारासारख्या प्रतिष्ठित सन्मानांनी गौरविण्यात आले आहे. मात्र, त्यांच्या मते सर्वात मोठा पुरस्कार म्हणजे श्रोत्यांच्या मनात निर्माण होणारे भावनिक नाते. "जेव्हा एखादा श्रोता सांगतो की आमच्या संगीतामुळे त्याला दिलासा मिळाला, घराची आठवण झाली किंवा एखादी सुंदर आठवण पुन्हा जागी झाली, तेव्हा तोच आमच्यासाठी सर्वात मोठा सन्मान असतो," असे ते सांगतात.

हर्षदुहिता कलेक्टिव्हचा ठाम विश्वास आहे की परंपरा केवळ जपण्याची गोष्ट नसून ती अनुभवली, जगली आणि पुढील पिढीपर्यंत पोहोचवली पाहिजे. याच ध्येयाने प्रेरित होऊन हा समूह भारतीय संगीत वारशाला आधुनिक काळातील नवा आवाज देत आहे.

वाढता श्रोता वर्ग, राष्ट्रीय स्तरावरील लोकप्रियता आणि कलात्मक प्रामाणिकतेची जपणूक यामुळे हर्षदुहिता कलेक्टिव्ह भारतीय संगीत क्षेत्रातील एक प्रेरणादायी नाव ठरत आहे.

वेगाने बदलणाऱ्या जगातही परंपरेचा आत्मा जपत वर्तमानाशी संवाद साधणारे त्यांचे संगीत आजच्या पिढीसाठी आशेचा आणि संस्कृतीशी जोडणारा सुरेल धागा ठरत आहे. भारतीय संगीताचा वारसा जपत नव्या पिढीशी नाते जोडणारा हर्षदुहिता कलेक्टिव्ह आज संगीतविश्वात नव्या युगाचा स्वर बनला आहे.

## नवी कोरी मिनी कंट्रीमॅन सी भारतात सादर



**चेन्नई (दै. आरंभ पर्व)**

आधुनिक पिढीची कंट्रीमॅन आता "मेड इन इंडिया" म्हणजेच भारतात निर्मिली जाणारी आणि स्थानिक पद्धतीने याचा पेट्रोल वेरियंटची निर्मीती ही बीएमडब्लू ग्रुपच्या भारतात नव्या मिनी कंट्रीमॅन सी चे सादरीकरण करण्यात आले आहे. या गाडीचे उत्पादन चेन्नई येथील प्लान्टमध्ये केले जाणार आहे. कारची बुकिंग ही सगळ्या मिनी इंडियाच्या आधिकृत डिलर्सकडे करता येईल आणि त्याचा डिलिवरीज देखील अगदी लगेच सुरू करण्यात येतील. या कारमध्ये आत्याधुनिक मिनी ट्वीनपॉवर टर्बो तंत्रज्ञान तसेच दमदार गो-कार्ट फीलचा ट्रेडमार्क आणि पेट्रोल इंजिन चालविण्याचा एक विशेष अनुभव मिळणार आहे. तीन वर्षांनंतर देखील ६६% पर्यंतची या श्रेणीतील सर्वोत्तम बायबॅक किंमत ची हमी कंपनीकडून दिली जाणार आहे. स्टयालिश अशा "फेवर्ड पॅक" मध्ये उपलब्ध, नव्या कोऱ्या मिनी कंट्रीमॅन सी ची एक्स-शोरूम किंमत ही भारतीय चलनात ४७,५०,००० एवढी असेल. श्री. हरदीप सिंग ब्रार, बीएमडब्लू ग्रुप इंडियाचे अध्यक्ष आणि सीईओ यावेळी बोलताना म्हणाले, " नवी कोरी मिनी कंट्रीमॅन सी ही आपल्या काळातील एक बिग (भव्य) असा अनुभव देणारी गाडी आहे. ही गाडी पारंपारिक मिनी ला सुंदर पद्धतीने एका दमदार अशा एसयुव्ही मध्ये रूपांतरीत करते.





## सचिन मोरे यांच्याकडून स्वखर्चातून टँकर व्यवस्था

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहरात प्रशासनाने लागू केलेल्या पाणीकपातीमुळे सिंहगड रोड परिसरातील अनेक भागांमध्ये पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांना दिलासा देण्यासाठी नगरसेवक सचिन मोरे यांनी स्वखर्चातून पाण्याच्या टँकरची व्यवस्था केली आहे.


पाणीटंचाईग्रस्त भागांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला असून नागरिकांच्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. पाण्याअभावी नागरिकांची गैरसोय होऊ नये, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

यावेळी नगरसेवक सचिन मोरे म्हणाले, "लोकप्रतिनिधी म्हणून नागरिकांच्या अडचणी जाणून घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करणे हे माझे कर्तव्य आहे. कोणत्याही कुटुंबाला पाण्याअभावी त्रास होऊ नये, यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना पुढील काळातही सुरू राहतील."

सिंहगड रोड परिसरातील पाणीपुरवठा नियमित होईपर्यंत गरजेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू ठेवण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली आहे.

सिंहगड रोड परिसरातील नागरिकांना यामुळे निश्चितपणे दिलासा मिळणार आहे.

## हिल्टनने 'स्पार्क बाय हिल्टन' हॉटेल्स सुरू करण्याची केली घोषणा




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हिल्टनने आज बेंगळुरू आणि गोवा येथे 'स्पार्क बाय हिल्टन' हॉटेल्स सुरू करण्याची घोषणा केली असून, या ब्रँडचे आशिया पॅसिफिकमध्ये आगमन झाले आहे. हे उद्घाटन हिल्टनच्या ऑलिव्ह हॉस्पिटॅलिटीसोबत देशभरात १५० 'स्पार्क बाय हिल्टन' हॉटेल्स सुरू करण्याच्या धोरणात्मक करारावर आधारित आहे.

भारतातील लाँचिंगसाठी, 'स्पार्क बाय हिल्टन' स्थानिक प्रवाशांच्या गरजा आणि अपेक्षा लक्षात घेऊन काळजीपूर्वक तयार करण्यात आले आहे. आराम, सोय आणि उत्कृष्ट अतिथी अनुभवांवर लक्ष केंद्रित ठेवत हा ब्रँड भारतीय बाजारपेठेसाठी स्वतःला कसे अनुकूल करू शकतो, हे यातून दिसून येते. मोफत नाश्त्याव्यतिरिक्त ज्यामध्ये खास 'डीआयवाय' डोसा स्टेशन्स असतील , नवीन 'स्पार्क बाय हिल्टन' हॉटेल्स प्रादेशिक सेवेचे पैलू सादर करतील, जसे की सेल्फ-सर्व्ह चाय- कार्ट , निवडक ठिकाणी जिम आणि इन-रूम डायनिंग यांसारख्या सुविधा, तसेच चार्जर, बॅटरी आणि स्नॅक्स यांसारख्या अत्यावश्यक वस्तू पुरवणारी वेंडिंग मशीन्स उपलब्ध असतील. यातील प्रत्येक सुविधा मुक्कामादरम्यान येणाऱ्या अडचणी कमी करण्यासाठी आणि प्रवाशांचा प्रवास अधिक सुकर करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे. डिजिटल चेक-इन, डिजिटल की , सर्व्हिस रिक्वेस्ट सपोर्ट आणि हिल्टन ऑनर्स अँप इंटिग्रेशन यांसारखी तंत्रज्ञान-सक्षम वैशिष्ट्ये पाहुण्यांना अधिक सुलभ अनुभव देण्यासाठी तयार केली गेली आहेत. हिल्टनचे वरिष्ठ उपाध्यक्ष आणि प्रादेशिक प्रमुख (दक्षिण आशिया), जुबिन सक्सेना म्हणाले, "आधुनिक भारतीय प्रवासी झपाट्याने बदलत आहेत, ग्राहक आता अशा ब्रँडेड मुक्कामाचा शोध घेत आहेत जे गुणवत्ता, सुविधा आणि सुसंगतता प्रदान करतील. 'स्पार्क बाय हिल्टन' थेट ही गरज पूर्ण करते आणि ऑलिव्ह हॉस्पिटॅलिटीसोबतची आमची भागीदारी आम्हाला या बाजारपेठेला साजेशा वेगाने पुढे जाण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देते. या पहिल्या दोन उद्घाटनांसह, आम्ही असे उत्पादन सादर करत आहोत जे हिल्टनचे विश्वासार्ह सेवा मानक राखत आजच्या व्यावहारिक प्रवाशांच्या पसंतीस उतरेल." हे उद्घाटन हिल्टन आणि ऑलिव्ह हॉस्पिटॅलिटीने भारतातील पहिल्या १० 'स्पार्क बाय हिल्टन' स्वाक्षऱ्यांच्या घोषणेनंतर झाले आहे. आगामी वर्षांत जयपूर, नाशिक, मथुरा, पुणे, राजकोट आणि हैदराबाद या प्रमुख व्यावसायिक आणि पर्यटन कॉरिडॉरमध्ये अतिरिक्त 'स्पार्क बाय हिल्टन' हॉटेल्स उघडण्याची अपेक्षा आहे. 'स्पार्क बाय हिल्टन' हॉटेल्स हे हिल्टनच्या २८ वेगवेगळ्या हॉटेल ब्रँड्ससाठी असलेल्या पुरस्कारप्राप्त अतिथी लॉयल्टी प्रोग्राम 'हिल्टन ऑनर्स' मध्ये सहभागी आहेत. जे हिल्टन ऑनर्स सदस्य थेट हिल्टनच्या पसंतीच्या चॅनेलद्वारे बुकिंग करतात त्यांना तत्काळ लाभ मिळतात, ज्यामध्ये लवचिक पॉइंट्स आणि मनी पेमेंट पर्याय, विशेष सदस्य सवलत आणि मोफत मानक वाय-फाय समाविष्ट आहे. सदस्यांना केवळ हिल्टन ऑनर्स मोबाईल अँपद्वारे उपलब्ध असलेल्या लोकप्रिय डिजिटल साधनांचाही आनंद घेता येतो, ज्यामध्ये डिजिटल चेक-इन, रूम निवड आणि डिजिटल की समाविष्ट आहे.

## अँडी जॅसी यांनी घेतली माननीय पंतप्रधान मोदी यांची भेट



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ॲमेझॉनचे मुख्य कार्यकारी अधिकारी अँडी जॅसी यांनी आज नवी दिल्लीत माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. जॅसी यांनी ॲमेझॉनच्या भारताप्रती असलेल्या दीर्घकालीन कटिबद्धतेचा पुनरुच्चार केला आणि २०३० पर्यंत देशातील एआय आणि क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चरचा विस्तार करण्यासाठी अतिरिक्त १३ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याची घोषणा केली. यामुळे २०२६ ते २०३० दरम्यान एआय आणि क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चरचा विस्तार व समर्थनासाठी ॲमेझॉनची एकूण नियोजित गुंतवणूक २१ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त होईल, ज्यामुळे ॲमेझॉन देशातील सर्वात मोठा जागतिक एआय आणि क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चर गुंतवणूकदार म्हणून प्रस्थापित होईल. या गुंतवणुकीमुळे मुंबई आणि हैदराबादमधील एडब्ल्यूएस डेटा सेंटरची क्षमता वाढेल; ज्यामुळे स्टार्टअप्स, उद्योग आणि सरकारी संस्थांना सानुकूल एआय चिप्स, व्यवस्थापित एआय सेवा, सुरक्षित व विश्वासार्ह क्लाउड तंत्रज्ञान आणि डेव्हलपर टूल्स मिळतील, ज्यामुळे ते अधिक वेगाने नाविन्यता आणू शकतील, वेगाने विस्तार करू शकतील आणि जागतिक स्तरावर ग्राहकांना सेवा देऊ शकतील. २०१०-२०३० या कालावधीत ॲमेझॉनची भारतातील एकूण संचित गुंतवणूक ८८ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त झाली आहे. ॲमेझॉन आपल्या ई-कॉमर्स आणि क्विक कॉमर्स व्यवसायाला बळ देणाऱ्या ऑपरेशन्स नेटवर्कमध्ये गुंतवणूक सुरूच ठेवेल. कंपनीने या वर्षात २० हून अधिक नवीन फुलफिलमेंट सेंटर्स आणि १०० हून अधिक नवीन लास्ट माईल डिलिव्हरी स्टेशन्स सुरू करण्याचे नियोजन केले आहे, ज्यामुळे देशभरातील ग्राहकांना, विशेषतः टियर ३ आणि ४ शहरांमध्ये जलद आणि विश्वासार्ह डिलिव्हरी मिळेल.

# नॉलेज नेक्स्ट 'नासा ट्रेनिंग प्रोग्राम' निवडीसाठी सप्टेंबरमध्ये परीक्षा




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अमेरिकेतील नॅशनल एरोनोटिक्स अँड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशनच्या (नासा) सहकार्याने हन्टस्वीले, अल्बामा येथे उभारलेल्या यूएस स्पेस अँड रॉकेट सेंटरमधील 'नासा'च्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी (नासा ट्रेनिंग प्रोग्राम) महाराष्ट्रात घेण्यात येणारी निवड चाचणी परीक्षा सप्टेंबर 2026 मध्ये होणार आहे. भारतामध्ये स्वान रिसर्च अँड सोशल स्टडी फाऊंडेशनच्या वतीने घेण्यात येणार आहे.. इयत्ता 6 वी ते 12 वी च्या मुलांना ही परीक्षा देता येणार असून, या परीक्षेसाठी अर्ज करण्याची मुदत 29 जुन 2026 ते 31 ऑगस्ट 2026 असल्याची माहिती स्वान फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शशिकांत कांबळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी सचिव विकास टाकळीकर , कोषाध्यक्ष अक्षय खोब्रागडे, सहसचिव गौरव सोमवंशी,प्रसाद भोपळे, अमन पाचघरे आणि संकेत जैन आदी उपस्थित होते.

शशिकांत कांबळे म्हणाले , "स्वान रिसर्च अँड सोशल स्टडी फाऊंडेशन वतीने भारतामध्ये पहिल्यांदाच 2023 ला ट्रेनिंग प्रोग्रामच्या निवडीसाठी महाराष्ट्रामध्ये इ. ६ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यासाठी परिक्षा घेण्यात आली त्या परीक्षे नंतर काही विध्यार्थींना आलाबमा सेंटर व सिंगापूर सायन्स सेंटर ला घेऊन. जाण्यात आले. यावर्षी 2 री नॉलेज नेक्स्ट परीक्षा आयोजित करण्यात आली आहे.प्रत्येक वर्गासाठी स्वतंत्र प्रश्नपत्रिका असेल. प्रामुख्याने गणित, विज्ञान, भूगोल, बुद्धिमापन यावर आधारित प्रश्नपत्रिका असेल. यामुळे विद्यार्थी चाकोरीबाहेर जाऊन विषयांचा अभ्यास करणार आहेत. शिवाय अंतराळविषयक संशोधन, प्रात्यक्षिके यांचा अभ्यास त्यांना विद्यार्थीदशेत करायला मिळणार असून, येणाऱ्या पिढीसाठी हे महत्वाचे आहे."

विकास टाकळीकर म्हणाले, "ही परीक्षा महाराष्ट्रातील इंग्रजी, सेमी इंग्रजी माध्यमातील शाळांसह जिल्हा परिषद, महानगपालिका, नगरपालिका शाळांचाही समावेश आहे. या परीक्षेसाठी 29 जून पासून नावनोंदणी करता येणार आहे. 30 ऑगस्ट 2026 पर्यंत नावनोंदणी सुरु राहील. या परीक्षेतून निवड होणाऱ्या विद्यार्थ्यांचा ऑक्टोंबर सत्कार होणार आहे. जानेवारी आणि फेब्रुवारी मध्ये युएस स्पेस अँड रॉकेट सेंटर, हन्टस्वीले, अल्बामा आणि सिंगापूर सायन्स येथे विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी नेण्यात येईल. अमेरिकेतील स्पेस कॅम्प, न्यूयॉर्क, वॉशिंग्टन, ऑरलॅन्डो या ठिकाणीही विद्यार्थ्यांना घेऊन जाण्यात येणार आहे. ."

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.